माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ अन्वये दाखल झालेली तक्रार**

**रामाआ- तक्रार क्र. बीएम- २२८/२०२१**

**तक्रारकर्ता श्री. अशोक आनंद**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी**
ग्रँट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर.ज.जी.समुह रुग्णालये,
मुंबई-४०० ००८.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्य प्रशासकीय अधिकारी**
ग्रँट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर.ज.जी.समुह रुग्णालये,
मुंबई-४०० ००८.

**तक्रार अर्ज सुनावणी दिनांक : ०९.०४.२०२६**

| | | |
|---|---|---|
| तक्रारकर्ता | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | उपस्थित |

सदर प्रकरणी प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. ११.०४.२०१९ रोजी पुढीलप्रमाणे आदेशीत केले होते:-

*"अर्जदाराच्या माहिती अधिकार अर्ज व प्रथम अपिलीय अर्जाचा सखोल अभ्यास करून अर्जदारास माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत जन माहिती अधिकारी तथा प्रशासकिय अधिकारी, ग्रॅन्ट शासकिय वैद्यकिय महाविद्यालय, मुंबई यांनी १५ दिवसांच्या आत महिला तक्रार निवारण समितीकडून अर्जदारास परस्पर माहिती देण्यासंबंधी अवगत करण्यात यावे."*

२. तक्रारकर्ता यांना उक्त आदेशाच्या अनुषंगाने माहिती मिळाललेली नाही म्हणून त्यांनी आयोगाकडे दि. ०२.०५.२०१९ रोजी व्दितीय अपील सादर केले. आयोगाने सदर प्रकरणी अपील क्र. MHSICMU/२०१९/M/००१८११ मध्ये दि.२४.०५.२०२१ रोजी पुढीलप्रमाणे निष्कर्ष नोंदवून आदेश पारित केले आहेत :-

*"अपिलार्थी यांनी दाखल केलेला व्दितीय अपील अर्ज माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम (१८) अंतर्गत तक्रार म्हणून दाखल करण्यात येत आहे."*

३. उक्त आदेशाच्या अनुषंगाने आयोगाच्या कार्यालयाने दि. २४.०५.२०२२ रोजीच्या पत्रान्वये जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, ग्रँट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर ज.जी. समुह रुग्णालये, मुंबई यांच्याकडून अहवाल मागितला. जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, ग्रँट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर ज.जी. समुह रुग्णालये, मुंबई यांच्याकडून आयोगास दि.१७.०६.२०२२ रोजी अहवाल प्राप्त झालेला आहे.

..२/-

४. सुनावणीच्या वेळी तक्रारकर्ता, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित असून तक्रारकर्ता यांनी आयोगास सादर केले की, त्यांना प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेशानंतर आतापर्यंत कोणतीही माहिती प्राप्त झालेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केले की, त्यांच्या अभिलेखावर डॉ. रागीणी पारेख, प्राध्यापक व विभाग प्रमुख, नेत्रशल्यचिकित्सा शास्त्र विभाग तथा तत्कालीन अध्यक्ष, महिला तक्रार निवारण समिती, सर ज.जी. समुह रुग्णालये, मुंबई यांचे दि.३०.१०.२०१८ रोजी अधिष्ठाता, ग्रँट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर ज.जी. समुह रुग्णालये, मुंबई यांना पाठविण्यात आलेले अहवालाची प्रत उपलब्ध आहे. परंतु, सदर अहवालावर फक्त अध्यक्षांची स्वाक्षरी आहे व अन्य चौकशी समितीचे अन्य सदस्यांनी स्वाक्षरी त्या अहवालावर नाही. माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अभिलेखावर उपलब्ध असलेली माहिती तक्रारकर्ता यांना उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे व त्याप्रमाणे सदर अहवालाची प्रत दि. १७.०६.२०२२ रोजीच्या पत्रासह संलग्न करुन तक्रारकर्ता पाठविलेली होती.

५. तक्रारकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांच्या अभिलेखावर उपलब्ध असलेली डॉ. रागीणी पारेख, प्राध्यापक व विभाग प्रमुख, नेत्रशल्यचिकित्सा शास्त्र विभाग तथा तत्कालीन अध्यक्ष, महिला तक्रार निवारण समिती, सर ज.जी. समुह रुग्णालये, मुंबई यांचे दि.३०.१०.२०१८ ची प्रत उपलब्ध करुन देण्याची विनंती केली.

६. सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी डॉ. रागीणी पारेख, प्राध्यापक व विभाग प्रमुख, नेत्रशल्यचिकित्सा शास्त्र विभाग तथा तत्कालीन अध्यक्ष, महिला तक्रार निवारण समिती, सर ज.जी. समुह रुग्णालये, मुंबई यांचे दि.३०.१०.२०१८ रोजीच्या पत्राची प्रत तक्रारकर्ता यांना उपलब्ध करुन दिली व तक्रारकर्ता यांनी ती स्विकारली.

७. या तक्रारीसंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, तक्रारकर्ता यांना माहिती देण्यात आलेली आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission
Greater Mumbai

15-4-2026

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक : १५.०४.२०२६**